महाराष्ट्र शासन
वस्तू व सेवाकर विभाग
विशेष राज्यकर आयुक्त यांचे कार्यालय,
एच-विंग, ३ रा मजला, वस्तू व सेवाकर भवन,
माझगांव, मुंबई-४०० ०१०.

दूरध्वनी क्र.-०२२ २३७६ ०३९१/०३९८/०८७२ ई-मेल-dcest००१@gmail.com

---

क्रमांकः-रा.उ.आ./आस्था-४/रा.नि.बदली-२०२६/अन्वेषण पदस्थाप.निकष/ब- 50 मुंबई, दिः- 18 FEB 2026

प्रति,
सर्व आस्थापना अधिकारी,
मुंबई विभाग.

विषय :- राज्यकर विभागाने बदली सन २०२६ संदर्भात राज्यकर निरीक्षक संवर्गाकरिता अन्वेषण शाखेत पदस्थापनेसाठी ठरविलेले निकष / मार्गदर्शक तत्वे.

उपरोक्त विषयानुसार, राज्यकर विभागातील राज्यकर निरीक्षक यांच्या बदली सन २०२६ संदर्भात अन्वेषण शाखेतील पदस्थापनेकरीता ठरविलेले निकष / मार्गदर्शक तत्वे राज्यकर विभागाच्या वेबसाईट वर प्रसारीत करण्यात येत आहेत. तरी सदर निकषांबाबत आपल्या कार्यालयातील अधिनस्त असलेल्या राज्यकर निरीक्षकांच्या निदर्शनास आणून सदरबाबत उचित सुचना असल्यास एकत्रीतपणे योग्य मार्गाने या कार्यालयास ८ दिवसांच्या आत पाठविण्यात याव्यात.

**(मा. विशेष राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मान्यतेने.)**

सोबत - वरीलप्रमाणे.

(संजय निकम)
राज्यकर सहआयुक्त, (मुख्यालय) ४,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

# राज्यकर विभागाने बदली सन — २०२६ संदर्भात अन्वेषण शाखेतील पदस्थापनेसाठी ठरविलेले निकष / मार्गदर्शक तत्वे (राज्यकर निरीक्षक) चा प्रारुप मसुदा

A] अन्वेषण शाखेतील पदस्थापनेचे निकष -:

*अ] अन्वेषण शाखेत पदस्थापनेसाठी पात्रता निकष (Qualifying Criteria) :-*

I. अन्वेषण शाखेत पदस्थापना देण्यासाठी संबंधित राज्यकर निरीक्षक सर्वसाधारण बदलीस पात्र असावा.

II. संबंधित राज्यकर निरीक्षकाचे वय ५४ वर्षापेक्षा जास्त असू नये.

III. संबंधित राज्यकर निरीक्षकाची कोणतीही विभागीय चौकशी / लाचलुचपत प्रतिबंध विभागाची चौकशी सुरु नसावी. तसेच सचोटी बाबत प्रतिकुल शेरे नसावेत.

IV. संबंधित राज्यकर निरीक्षक सध्या अन्वेषण शाखेत कार्यरत नसावा. तसेच राज्यकर निरीक्षक पदावर यापुर्वी एकदाही अन्वेषण शाखेत काम केलेले नसावे.

V. राज्यकर निरीक्षकपदी किमान तीन वर्षे किंवा अधिक सेवा झाली आहे अशा राज्यकर निरीक्षकांच्या बाबतीत, अन्वेषण शाखेत बदली करताना, तीन वर्षे सेवा झाली असल्यास २४, चार वर्षे सेवा झाली असल्यास ३२ व पाच वर्षे सेवा झाली असल्यास ४० किंवा त्याहून अधिक गोपनीय अहवालाचे गुण व सचोटी उत्कृष्ट असणे आवश्यक आहे

VI. सदर पात्र कर्मचारी हा अन्वेषण शाखेत काम करण्यास अनिच्छुक नसावा.

कर्मचाऱ्यांच्या लगतच्या ५ वर्षांच्या गोपनीय अहवालाच्या प्रत्यक्ष गुणांची बेरीज ५० पैकी ४० किंवा त्याहून अधिक असावी. तथापि यापैकी एका वर्षाचा गोपनीय अहवाल उपलब्ध नसल्यास अथवा ६ महिन्यापेक्षा कमी कालावधीचा उपलब्ध असल्यास सदर बाबत एक वर्ष आधीचा गोपनीय अहवाल विचारात घेण्यात येईल.

*ब] अन्वेषण शाखेत पदस्थापनेकरीता निवड करण्यासाठीचे निकष (Selection Criteria) :-*

अन्वेषण शाखेत त्या त्या वर्षी जितकी पदस्थापना आवश्यक आहे त्यानुसार आढावा घेतला जाईल व पात्रता निकष पूर्ण करणाऱ्या निरीक्षकांमधुन निवड करताना खालील मुद्यांच्या आधारे पदस्थापना देण्यात येईल-

जे निरीक्षक वरील पात्रता निकषांनुसार पात्र ठरतात त्यांची सेवाज्येष्ठतेप्रमाणे यादी करुन अन्वेषण शाखेतील पदांच्या उपलब्धतेनुसार आवश्यक असलेल्या सेवाज्येष्ठ निरीक्षकांना अन्वेषण शाखेत पदस्थापना देण्यासाठी विचार करण्यात येईल.

- तसेच पदस्थापना करताना प्रशासनाची निकड, कर्मचाऱ्याचे वय, गुणवत्ता,सेवाजेष्ठता, रिक्त पदे इ. सर्व बाबींचा साकल्याने विचार करुन राज्यकर निरीक्षकांची पदस्थापना बदलण्याबाबत अंतिम निर्णय घेण्यात येईल.